प्राप्त तारिख : २७/०८/२०१५
नोंदणी तारिख : २७/०८/२०१५
निकाल तारिख : २६/१०/२०१८
कालावधी : वर्षे महिने दिवस
०३ ०१ २९

**<u>सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, करमाळा यांच्या न्यायालयात</u>**

( पीठासीन अधिकारी : संग्राम सु. जाधव )

**<u>नियमीत दिवाणी दावा क्र. २३६/२०१५</u>** **<u>निशाणी क्र.३९/अ</u>**

| | |
|---|---|
| १. सिमा उर्फ सिता भ्र. विलास देवकते<br>वय: ४६ वर्षे, धंदा: घरकाम,<br>रा. सिंचन नगर, बायपास रोड,<br>ता.करमाळा, जि.सोलापूर. | **<u>वादी</u>** |

***<u>विरुद्ध</u>***

| | |
|---|---|
| १. राहीबाई भ्र. बाबुराव शिंदे (मयत)<br>२. किसन बाबुराव शिंदे<br>वय वर्षे ५५, व्यवसाय : शेती<br>३. बापुराव बाबुराव शिंदे<br>वय वर्षे ५०, व्यवसाय : शेती<br>अ.क्र.२ व ३ रा. पोथरे, ता. करमाळा, जि.सोलापूर.<br>४. कुसुम भ्र. मुरलीधर दिंडे<br>वय वर्षे ५६, व्यवसाय : घरकाम<br>रा. मंगरूळ, ता. आष्टी जि.बीड<br>५. छाया भ्र. दत्तु शेंडगे<br>वय वर्षे ४८, व्यवसाय : घरकाम<br>रा. खरातवाडी (पिंपळगांव पिसा), ता.श्रीगोंदा, जि. अहमदनगर<br>६. बायडा भ्र. दादासाहेब नरूटे<br>वय वर्षे ४४, व्यवसाय : घरकाम<br>रा. खांबेवाडी, ता. करमाळा, जि.सोलापूर. | **<u>प्रतिवादी</u>** |

// च्ंहम दनउइमते //

**दावा :—** वाटपासाठी आणि निरंतर मनाई आदेश मिळणेसाठी

....................................................................................

वादीच्या वतीने विधीज्ञ श्री. एम.डी.कांबळे
प्रतिवादी क्र.२ व ३ यांचे विधीज्ञ श्री.जे.डी.देवकर
प्रतिवादी क्र.१,४,५ आणि ६ यांच्याविरूध्द प्रकरण एकतर्फा चालविण्यात आला.

....................................................................................

## न्यायनिर्णय

(पारित दिनांक २६ माहे ऑक्टोबर २०१८)

वादीने सदरचा दावा प्रतिवादीविरूध्द सरस निरस मानाने वाटप होवून मिळणेसाठी आणि निरंतर मनाई आदेश मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

०२. **वाद मिळकत**:

मौजे पोथरे, ता. करमाळा, जि. सोलापुरच्या हद्दीतील येथील शेतजमिन मिळकत —

| **अ.क्र.** | **क.ग.नं.** | **क्षेत्र** | **आकार** |
|---|---|---|---|
| | | हे = आर | रू. = पै. |
| अ. | २३९ पैकी | ०२ = ३६ | ०२ = २५ |
| ब. | २५५/१/ब पैकी | ०१ = ०० | ०२ = ३५ |
| क. | २०७ पैकी | ०२ = ९९ | ०७ = ०० |
| ड. | २७९ पैकी | ०० = ०२ | ०० = ०५ |
| इ. | २०९ पैकी | ०० = ०१ | ०० = ०० |
| ई. | २१७ पैकी | ०२ = ५१ | ०२ = ४५ |

प्रस्तुत शेतजमिनी या दाव्याचा विषय असल्याने सोयीसाठी त्यांचा उल्लेख *'वाद मिळकत'* असा करण्यात येत आहे. वादी व प्रतिवादी यांच्या घराण्यांची वंशावळ —

बाबुराव पांडुरंग शिंदे
(२००३ साली मयत)

राहीबाई—प्रतिवादी क्र.१

| किसन (प्रतिवादी क्र.२) | बापुराव (प्रतिवादी क्र.३) | कुसुम (प्रतिवादी क्र.४) | छाया (प्रतिवादी क्र.५) | सिमा उर्फ सिता (वादी) | बायडा (प्रतिवादी क्र.६) |
|---|---|---|---|---|---|

३. **<u>वादी यांचे कथन</u>** :—

वादी आणि प्रतिवादी हे एकाच कुटुंबातील सदस्य आहेत. त्यांच्यात अदयाप वाद मिळकतीचे वाटप झालेले नाही. मात्र सन २०१४ पासून त्यांच्यात एकत्ररित्या वहिवाट करण्यावरून वादविवाद सुरू झाले. दि. १५/०८/२०१५ रोजी वादी यांनी वाद मिळकतीतील हिस्सा पृथक करून मागितला मात्र प्रतिवादी यांनी तो देण्यास नकार दिला. सबब वादी प्रस्तुतचा दावा वाटपासाठी आणि निरंतर ताकिदीसाठी दाखल केला.

०४. प्रतिवादी क्र. १ दावा प्रलंबित असताना मयत झाल्या. मात्र वादी आणि प्रतिवादी हेच त्यांचे वारस असल्याने नव्याने वारस दाव्यात सामील करण्यात आले नाही. प्रतिवादी क्र.२ व ३ यांना दाव्याचे समन्स

बजावले. प्रतिवादींचे विधीज्ञांनी आपले वकीलपत्र दाखल केले मात्र कैफियत न दाखल केल्यामुळे त्यांच्याविरूध्द दावा विनाकैफियत चालविण्यात आला. प्रतिवादी क्र.१,४,५ व ६ यांना समन्सची योग्य बजावणी झाली परंतु ते या कामी हजर झाले नाही. सबब निशाण क्र.१ वरील आदेशान्वये व दिवाणी प्रक्रिया संहितेमधील तरतुदीन्वये सदरचा दावा त्यांच्याविरूध्द एकतर्फा चालविण्यात आला.

०५. वादी यांच्या कथनावरून व त्यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांवरून पुढील मुदद्े माझ्या विचारार्थ उपस्थित झाले. सदर मुद्दयांवरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

| | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १) | वाद मिळकत ही वादी आणि प्रतिवादी क्र.१ ते ६ यांची वडिलोपार्जित एकत्र हिंदु कुटुंबाची मिळकत आहे हे वादी सिध्द करतात काय ? | .... | होय |
| २) | वादी यांनी मागणी केल्याप्रमाणे वाद मिळकतीचे वाटप होवून पृथक कब्जा मिळविण्यास वादी पात्र आहेत काय ? | .... | होय |
| ३) | वादी यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांना वाद मिळकतीत १/७ हिस्सा मिळविण्यास ते पात्र आहेत काय ? | .... | अंशतः होकारार्थी |
| ४) | वादी यांनी मागणी केल्याप्रमाणे प्रतिवादी यांच्या विरूध्द निरंतर ताकिदीचा आदेश मिळविण्यास ते पात्र आहेत काय ? | .... | होय |

| | | | |
|---|---|---|---|
| ५) | काय आदेश व हुकूमनामा? | .... | अंतिम आदेशा प्रमाणे |

## <u>कारणमिमांसा</u>

०६. वादीने त्याच्या कथनाच्या पुष्ठयर्थ स्वत:ला सा.क्र.१ म्हणून नि. क्र. ३१ खाली तपासले. नि.क्र. ३२ कडे पुरशिस दाखल करून पुरावा बंद करण्यात आला. प्रतिवादी यांना उलटतपासाची संधी देवूनही त्यांनी उलट तपास घेतलेला नाही. या कारणास्तव वादी यांच्या सरतपासातील कथने अखंडीत राहिली आहेत.

**<u>मुददा क्र.१ ते ३</u>** :—

०७. वादी आणि प्रतिवादी हे हिंदु कुटुंबातील सदस्य आहेत. वादी यांनी शपथेवर वाद मिळकतीचे अदयाप वाटप झालेले नाही असे कथन केले आहेत ते कथन अखंडीत आहे. नि.क्र. ३४ सोबत दाखल करण्यात आलेल्या वाद मिळकतीच्या काही ७/१२ पत्रकी वादी यांचे नांव आढळून येत नाही. मात्र मिळकतीचे ७/१२ पत्रक हे मालकी हक्काचा पुरावा होवू शकत नाही. सबब वाद मिळकती या वादी आणि प्रतिवादी यांच्या घराणाच्या वडिलोपार्जित एकत्र हिंदु कुटुंबाच्या मिळकती आहेत हे वादी यांनी सिध्द केले आहे या कारणास्तव मुददा क्र. १ याचे उत्तर होकारार्थी देण्यात येत आहे.

०८. वादी यांचे वडील बाबुराव हे सन २००३ साली मयत झाल्याची बाब वादी यांना मान्य आहे. या कारणास्तव हिंदु वारसा

अधिनियम कलम ६ च्या सुधारणेस वादी पात्र नाही. तसेच वादी यांचा विवाह सन १९९४ नंतर झाला असे वादी यांचे कथन नाही. या कारणास्तव वादी या कलम ६ मधील महाराष्ट्र राज्याच्या सुधारणेप्रमाणे मुलांच्या बरोबर समान हिस्सा मिळविण्यास पात्र नाही. सबब वाद मिळकतीचे वाटप प्रतिकात्मक पध्दतीने करण्यात येत आहे.

०९. मयत बाबुराव यांना दोन मुले किसन, बापुराव आणि पत्नी राहिबाई तसेच मुली कुसूम, छाया, सिमा आणि बायडा हया आहेत. राहीबाई मयत आहे. सबब प्रस्तुत मिळकतीचे वाटप प्रथमत: बाबुराव, किसन आणि बापूराव यांच्यात करून त्यांना प्रत्येकी १/३ हिस्सा देण्यात येत आहे. मयत बाबुराव यांचा १/३ हिस्सा त्यांची दोन मुले आणि चार मुली यांच्यात समान प्रमाणात विभागून प्रत्येकी १/१२ हिस्सा देण्यात येत आहे. सबब प्रस्तुत वाटपाप्रमाणे वादी, प्रतिवादी क्र.४,५ व ६ यांना प्रत्येकी १/१२ आणि किसन आणि बापुराव यांना प्रत्येकी ४/१२ हिस्सा देण्यात येत आहे. सबब मुददा क्र. २ चे उत्तर होकारार्थी आणि मुददा क्र. ३ चे उत्तर अंशत: होकारार्थी देण्यात येत आहे.

१०. वादी यांनी प्रतिवादी यांच्याविरूध्द वाद मिळकतीची विक्री तिला पृथक कब्जा मिळेपावेतो करू नये असा तिने निरंतर ताकिदीची मागणी केली आहे. प्रतिवादी यांनी कोणताही विरोध न दर्शविल्यामुळे वादी यांच्या मागणीत तथ्यं आढळून येते. सबब मुददा क्र.४ चे उत्तर होकारार्थी देवून मुददा क्र. ५ साठी खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## **आदेश**

१. दावा मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी, प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांना प्रत्येकी १/१२ हिस्स आणि प्रतिवादी क्र. २ व ३ यांना प्रत्येकी ४/१२ हिस्सा देण्यात येत आहे.

३. प्रतिवादी यांना प्रस्तुत आदेशाव्दारे प्रतिबंधित करण्यात येते की, त्यांनी वाद मिळकतीमध्ये स्वतः किंवा स्वतः मार्फत इतर कोणीही इसम वाद मिळकतीचे कोणत्याही प्रकारे हस्तांतरण वादी यांना वाद मिळकतीचा पृथक कब्जा मिळेपावेतो त्रयस्थ इसमाना हस्तांतरीत करून अधिकार निर्माण करू नये.

४. उक्त नमुद मिळकतीचे सरसनिरस मानाने वाटून व विभाजन करणेसाठी मे.जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडे प्रारंभिक हुकूमनामा व पुढील अंमलबजावणीसाठी दिवाणी प्रक्रिया संहितेचे कलम ५४ अन्वये पाठविण्यात यावा.

५. दाव्याचा खर्च उभय पक्षकारांनी सोसावा.

६. येणेप्रमाणे प्राथमिक हुकूमनामा तयार करण्यात यावा.

दिनांकः २६.१०.२०१८

**( संग्राम सु. जाधव )**
सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
करमाळा, जिल्हा. सोलापूर.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment is same word to word as per the original Judgment.

| | |
|---|---|
| (a) Name of the Stenographer | :- G. L. Sutar |
| (b) Court | :- C.J.J.D. & JMFC Court, Karmala. |
| (c) Judgment signed by P.O.on | :- 26.10.2018 |
| (d) Judgment uploaded on | :- 03.11.2018 |